अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचे कार्यालय,
९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई - ४०००३०.
दुरध्वनी क्र. २४९२१२१२ (विस्ता),
Email- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :- १५/०३/२०२४

# प्रेसनोट

| | |
|---|---|
| ला.प्र.वि.कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, मुंबई. |
| गु.र.क्र | ०९/२०२४ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आलोसेचे नांव, कार्यालयाचा पत्ता | श्री. फ्रान्सिस रॉकी रेगो, पोलीस उप निरीक्षक,<br>सहार वाहतूक विभाग, अंधेरी पुर्व, मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रूपये २,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रूपये २,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांची दोन चारचाकी वाहने असून नमूद वाहने ओला कंपनीत कामाकरीता लावलेली आहेत. नमूद वाहनांपैकी एक वाहन हे तक्रारदार हे स्वःता चालवतात व दुसरे वाहनाकरीता चालक ठेवला आहे.<br><br>दिनांक १४/०३/२०२४ रोजी तक्रारदार यांना त्यांचे दुसऱ्या वाहनावरील चालकाने फोनवर संपर्क करून कळविले की, ते चालवत असलेले वाहन बिस्लेरी जंक्शन, अंधेरी पुर्व, मुंबई याठिकाणी सहार वाहतूक पोलीसांनी ताब्यात घेतले असून त्यावर रू. १७,०००/- दंड प्रलंबित आहे. तरी गाडी सोडण्याकरीता रू. २,०००/- दयावे लागतील असे सांगून लाचेची मागणी केली आहे. तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १४/०३/२०२४ रोजी ला.प्र.वि., मुंबई कार्यालयात समक्ष हजर राहून लेखी तक्रार अर्ज दिला.<br><br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १४/०३/२०२४ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी पंचासमक्ष लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र. १ यांना लाचेची रक्कम स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले म्हणून नमूद लोकसेवका विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी :-** **श्री. विजय पाटील सो, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग.**
**श्री. राजेंद्र सांगळे सो, अपर पोलीस उप आयुक्त,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बृहन्मुंबई विभाग.**
**श्री. भागवत सोनावणे सो, अपर पोलीस उप आयुक्त,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बृहन्मुंबई विभाग.**

( नितीन दळवी )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०००३०
**संकेतस्थळ** - acbmaharastra.gov.in,
**ईमेल** - 1) acbwebmail@mahapolice.gov.in, 2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
**ऑनलाईन तक्रार अर्ज-** 1) www.acbmaharastra.net.
**टोल फ्रि. क्र.** - १०६४
**दुरध्वनी क्रमांक** - ०२२ २४९२१२१२ **फॅक्स क्र.** ०२२२४९२२६१८, **व्हॉटसअप क्र.** ९९३०९९७७००